# <u>पोकळीस्त कुळांची नावे कमी करणे</u>

काही सात-बारा सदरी वर्षानुवर्षे इतर हक्कात कुळांची नावे आढळून येतात. अशा कुळांचा संबंधित शेतजमिनीवर ताबाही नसतो. अशा शेतजमिनीच्या मूळ मालकास शेतजमिनीवर कर्ज घेण्यास अडचण निर्माण होत असते. अशा पोकळीस्त कुळांची नावे इतर हक्कातुन कशी कमी करावी हा मोठा प्रश्न असतो.

मा. आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. ६८-टीएनसी/७८, दिनांक १९/१०/१९६८ अन्वये शासनास मार्गदर्शन विचारले होते. त्याचा आशय खालील प्रमाणे होता:

> अनेक सात-बारा सदरी शेत जमिनीवर दोन वर्षापेक्षा जास्त काळ ताबा नसलेल्या संरक्षीत कुळांची आणि साधारण कुळांची नावे इतर हक्कात दाखल असल्याचे दिसून येते. या कुळांची नावे इतर हक्कात दाखल असल्यामुळे सदर शेतजमिनीच्या मूळ मालकास शेतजमिनीवर कर्ज घेण्यास अडचण निर्माण होत आहे.
>
> १. दोन वर्षापेक्षा जास्त काळ शेतजमिनीवर ताबा नसल्यामुळे, हैद्राबाद कुळवहिवाट अधिनियम, कलम ३२ (१) अन्वये अशा कुळांनी शेतजमीन ताब्यात ठेवण्याचा हक्क गमावला आहे त्यामुळे त्यांची नावे इतर हक्कातुन कमी करण्यात यावी अशी धारणा आहे.
>
> २. तथापि, शेतजमिनीवर ताबा असणारे किंवा ताबा नसणारे, हैद्रबाद कुळवहिवाट अधिनियम, कलम ३८-इ, ३८-एफ अन्वये अन्वये घोषीत केलेले संरक्षीत कुळ आणि कलम ३८-जी अन्वये घोषीत साधारण कुळांची नावे तसेच कलम ३२ (१), ९८ आणि ३८-ई-(१) अन्वये सुनावणी सुरू असणाऱ्या संरक्षीत अथवा साधारण कुळांची नावे इतर हक्कातुन कमी करण्यात येणार नाहीत.
>
> ३. वरील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी शासनाने मार्गदर्शन करावे ही विनंती.

*(हैद्राबाद कुळवहिवाट अधिनियम, कलम ३२ (१) अन्वये, ज्या तारखेस कुळाला जमिनीचा किंवा राहत्या घराचा कब्जा मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असेल त्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत कुळाने तहसिलदारकडे असा कब्जा मिळण्यासाठी लेखी अर्ज करण्याची तरतुद आहे.*
*कलम ३८-इ, ३८-एफ आणि ३८-जी अन्वये, कुळाला शेतजमिनीचा मालक घोषीत करण्याची तरतुद आहे.*
*तर कलम ९८ अन्वये अवैधरित्या जमिनीचा ताबा धारण करणाऱ्या इसमास त्या जमिनीतुन काढून टाकण्याची तरतुद आहे.)*

महसूल व वन विभाग, सचिवालय, मुंबई यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. टीएनसी/६७६८/१५९६७२/-एम, दिनांक ०२/०१/१९६९ अन्वये मा. आयुक्त, औरंगाबाद विभाग यांच्या उपरोक्त पत्रास दिलेल्या उत्तराचा आशय खालील प्रमाणे आहे:

> आपल्या पत्रातील परिच्छेद क्रमांक १ आणि परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद कार्यवाही मान्य करण्यात येत आहे. तथापि, ज्यांचा शेतजमिनीवर ताबा नाही अशा संरक्षीत कुळांची आणि साधारण कुळांची नावे कमी करण्यापूर्वी हितसंबंधितांना नोटीस देऊन, फेरफार नोंदीव्दारे, हक्क नोंदणीची विहित प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

वरील प्रमाणे, ज्या सात-बाराच्या इतर हक्कात, दोन वर्षापेक्षा जास्त काळ ताबा नसलेल्या संरक्षीत कुळांची आणि साधारण कुळांची नावे वर्षानुवर्षे दाखल आहेत अशी नावे कमी करण्यात येऊ शकतात. तथापि, त्यापूर्वी सर्व हितसंबंधितांना नोटीस देऊन, फेरफार नोंदीव्दारे, हक्क नोंदणीची विहित प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

ज्याठिकाणी नोटीस बजावूनही इतर हक्कातील इसम हजर राहणार नाहीत तेथे त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर पंचनाम्याने नोटीस बजवावी तसेच संबंधित शेतजमिनीला डकवून नोटीस बजवावी आणि स्थानिक वृत्तपत्रातही नोटीस प्रसिद्ध करावी. जरूर तर गावच्या तलाठी, पोलीस पाटील व सरपंच यांचा अहवाल घ्यावा.

परंतु, ज्यांची कुळांची नावे कोणत्याही कुळवहिवाट अधिनियमान्वये संरक्षीत कुळ किंवा साधारण कुळ म्हणून घोषीत करण्यात आली असतील किंवा शेतजमिनीच्या ताब्याबाबत किंवा कुळ ठरवून मिळण्याबाबत ज्या प्रकरणांत दावा दाखल असेल किंवा सुनावणी सुरू असेल अशा संरक्षीत अथवा साधारण कुळांची नावे इतर हक्कातुन विहित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय कमी करण्यात येणार नाहीत.

सूलभ संदर्भासाठी इंग्रजीभाषेतील उपरोक्त दोन्ही मूळ पत्रे संलग्न आहेत.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

No. 68-TNC/ 78.
Commissioner's Office,
Aurangabad.
Dated : 19-10-68.

To

The Secretary to Government,
Revenue & Forest Department,
Sachivalaya, Bombay-32.

Subject:- Hyderabad Tenancy & Agricultural Lands Act,1950.
Deletion of entries from V.F.VII-XII of the tenants not in possession for more than two years.

Sir,

There are large numbers of entries in the "other rights" column of VII-XII showing the names of tenants, who are not in possession since more than two years. Since these names appear in the other rights column it has become difficult for theoccupants to obtain loan from the Land Mortgage Bank of Government. There appears no objection to delete the names of the protected tenants and ordinary tenants who are not in possession for more than two years and who have lost the right of recovery of possession U/Sc 32(1) of the Hyderabad Tenancy Act.

2. However names of protected tenants declared owners U/Sc.38-E 38-F and ordinary tenants declared owners U/Sc.38G of the Act. in possession or out of possession need not be deleted unless they are put in possession and recorded as occupants under the new and impartiable tenure. Similarly names of protected tenants or ordinary tenantss in respect of whom proceedings under Sc.32(1),98 or Explaination to Sc.38-E(1) are pending need not be deleted since deletion of possession U/Sc.32(1).

3. It is requested to move the Government to confirm the above action so than necessary instructions will be issued to the Revenue Officers in thisDivision.

Yours faithfully,
Sd/-
For Commissioner,Aurangabad.

"TRUE COPY"

Below cop y of Government in the Revenue and Forests Department's L.No. TNC-6768/139672-M,dt. 2-1-69 together with copy of this Office L.No. 68-TNC-78,dt.19.10.68 regarding deletion of entries from V.F.VII-XII.

No. 68-TNC-78.
Commissioner's Office,
Aurangabad. Dt.24-1-69.

Forwarded to all the Collectors, Dy.Collectors (Land Reforms) Sub-Divisional Officers and Tahsildars in Aurangabad Division for information and necessary action.

Sd/-
For Commissioner,Aurangabad.

Letter

To The Commissioner, Aurangabad Division, Aurangabad.

No. TNC-6768/159672/-M.

Revenue & Forests Department,
Sachivalaya, Bombay-32.
Dated, 2 January, 1969.

Subject:-H.T.&A.L.Act,1950.V.F.VII-XII of R.O.R.
Deletion of entries reg:.

Reference Your letter No. 68-TNC-78 dt.19th October 1968.
on the above subject.

2. The proposal contained in paragraph 1 and the action proposed in paragraph 2 of you letter under reference is approved. However the names of the protected tenants and ordinary tenants who are not in possession of the lands in quewtion may have to be deleted after recording a mutation entry and certifying it with due notice to the parties in accordance with the Record and Rights procedure.

Sd/-
Under Secretary to the Government of
Maharashtra, Revenue and Forest Department

----

"True Copy"

ЖⓞЖ

Dr. SANJAY KUNDETKAR